# DR. AMBEDKAR COLLEGE, DEEKSHABHOOMI, NAGPUR-10

| | |
|---|---|
| **NAME OF THE COMPETITION** | **:UNIVERSITY LEVEL-ONE ACT PLAY-AWARENESS ON DEMOCRACY IN INDIA, ELECTIONS AND TRANSPARENT PRACTICES** |
| **EVENT ORGANISED BY** | **:NARENDRA TIDKE ARTS AND COMMERCE COLLEGE, RAMTEK, DIST-NAGPUR-MAHARASHTRA** |
| **DATE OF THE EVENT** | **:17TH OCTOBER 2019** |
| **PARTICIPANTS** | **: NSS VOLUNTEERS-24 (BOYS-12) (GIRLS-12)** |
| **FIRST PRIZE** | **: CASH –RS. 2001/-** |



**YOUTUBE LINK FOR THE VIDEO**: https://www.youtube.com/watch?v=hV9EJVQpIqM&t=48s

NSS Volunteers of the college participated in the UNIVERSITY LEVEL-ONE ACT PLAY AWARENESS ON DEMOCRACY IN INDIA, ELECTIONS AND TRANSPARENT PRACTICES organized by NARENDRA TIDKE ARTS AND COMMERCE COLLEGE, RAMTEK, DIST-NAGPUR-MAHARASHTRA on 17TH OCTOBER 2019. The competition was held in view of the Legislative Assembly Elections in Maharashtra-2019. The theme of the competition was decided to create larger awareness among voters and strengthening their faith in the democratic system in India. There were 12 teams for the competition. The panel of Judges had members from the Civil Administration of the District. The play was largely appreciated and awarded the FIRST PRIZE. Later the team was also invited by the civil administrative officers of Kamptee-Dist- Nagpur Legislative Assembly Region to give a performance. Programme officer Dr. Ravindra Tirpude accompanied the team.

**नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय रामटेक, जि. नागपूर**

**राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर आणि विभागीय प्रशासन रामटेक**

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित.

# विद्यापीठस्तरीय
# लोकशाहीचा जागर : नाट्य स्पर्धा

**स्वच्छ निवडणुका आणि पारदर्शक लोकशाहीसाठी एक संदेश..**

**दिनांक : गुरूवार १७ ऑक्टोबर २०१९, सकाळी १०.०० वाजता पासून**

**स्थळ : श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, अंबाळा मार्ग रामटेक, जिल्हा नागपूर.**



| पारितोषिके | |
|---|---|
| प्रथम पारितोषिक | : रू. २००१ |
| द्वितीय पारितोषिक | : रू. १५०१ |
| तृतीय पारितोषिक | : रू. १००१ |
| प्रोत्साहन पारितोषिके | : एकूण पाच |
| सर्व स्पर्धकांना व्यक्तिशः प्रशस्ती पत्र देण्यात येईल | |




**नाट्य स्पर्धेविषयी थोडेसे...**

भारत देशाकडे लोकशाही मूल्य जपणाऱ्या देशाचे प्रतिबिंब म्हणून बघितले जाते. स्वातंत्र्याच्या सात दशकात लोकशाही अडचणीतून वृध्दींगत झालेली आहे. लोकशाही मूल्ये टिकवून ठेवायला आणि लोकशाहीच्या यशस्वितेसाठी पारदर्शक निवडणूका ही मूलभूत गरज आहे. लोकांनी निष्पक्ष आणि राष्ट्रीय हित लक्षात घेवून मतदान करायला हवे. मात्र अलीकडे निवडणुकात अनेक वाईट प्रथा प्रस्थापित झाल्याचे दिसून येते आणि याची सर्वांना जाणीव आहे. स्वार्थी राजकारणी लोकांनी दारू आणि पैसा मतदानाचा आधार करून ठेवला आहे. जाती – धर्माच्या नावावर मतदारांना प्रभावित करायच्या वाईट प्रथा लावल्या गेल्या आहेत. लोकशाहीला काळीमा फासला जाईल अशी वेगवेगळी अनेक आमिषे देवून स्वार्थी नेते मत मागतात. ह्या प्रथा लोकशाहीला घातक आहेत. अशा वाईट प्रथांना समाजात जनजागृतीतून दूर केले जाऊ शकते. २१ व्या शतकात अजूनही नागरिकांना मतदानाची किंमत समजली नाही. त्यासाठी लोकशाहीचा जागर ही काळाची गरज आहे. लोकशाहीचा पाया भक्कमपणे टिकवून ठेवायला निवडणुका स्वच्छ, भ्रष्टाचार मुक्त आणि पारदर्शक होणे ही काळाची गरज आहे. यासाठी तरुण वर्गाने लोकशाही मूल्ये स्वतः समजून घेवून ती समाजात रुजवायला लोकशाही मूल्याचा जागर आवश्यक आहे. समाजात जबाबदार नागरिकांना त्यांच्या कर्तव्याची आठवण करून देणे आजची गरज आहे आणि तरुण पिढीचे ते कर्तव्य सद्धा आहे.

त्यासाठी एक पाऊल म्हणून नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून 'लोकशाहीचा जागर' याचे आयोजन केले आहे. सर्व महाविद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयांना विनंती की आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) किंवा सांस्कृतिक विभागाच्या साहाय्याने आपल्या महाविद्यालयातून किमान एक नाट्य संच तयार करून स्पर्धेसाठी पाठवून पारदर्शक निवडणूक व लोकशाही वाढीसाठी सहकार्य करावे.

**विशेष सूचना:**

वरील पारितोषिकांशिवाय काहीं सन्माननीय महोदयांनी वेळेवर किंवा वेळे पूर्वी काही पारितोषिके जाहीर केल्यास ते त्या संचाला प्राप्त होतील.

**स्पर्धेसाठी पात्रता :**

नागपूर विद्यापीठ व नागपूर बोर्ड अंतर्गत सर्व श्रेणीतील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय. (कला, वाणिज्य,विज्ञान,अभियांत्रिकी कृषी, डी. एड., बी. एड व अन्य महाविद्यालय सहभागी होऊ शकतात.)

**नियमावली.**

- नाट्य स्पर्धेत सहभाग घेण्यासाठी किमान १५ ऑक्टोबर २०१९ दुपारी १.०० पर्यंत आयोजकांकडे नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.
- नाट्य स्पर्धेत नोंदणी निःशुल्क असेल व महाविद्यालातर्फे अधिकृत पत्र देवून नोंदणी करणे आवश्यक असेल.
- नाट्य संचा सोबत महाविद्यालय प्रतिनिधी म्हणून NSS प्रमुख किंवा अधिकृत शिक्षक उपस्थित असणे आवश्यक असेल.
- नाट्य, पथनाट्य व एकपात्री प्रयोग अपेक्षित. विषय लोकशाही, निवडणूका, मतदार जागृती, निवडणुकीतील वाईट प्रथा, निवडणुकीतील भ्रष्टाचार इत्यादी या अनुषंगानेच असावे.
- कोणत्याही पक्षाचे किंवा व्यक्तीचे नाव घेवून वादातीत वातावरण निर्माण होऊ शकेल असे भाग टाळणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्यांनी नाटकासाठी आवश्यक साहित्य स्वतः आणणे आवश्यक आहे.
- प्रथम, द्वितीय, तृतीय आणि प्रोत्साहनपर बक्षीस मिळालेल्या स्पर्धकांना त्यांची मान्यता असल्यास काही गावात याचे प्रयोग करता येतील.
- स्पर्धकांना नाटकाकरीता लागणारा खर्च व कार्यक्रमाच्या दिवशी येणारा प्रवास व प्रासंगिक खर्च वैयक्तिक किंवा संबंधित संस्थेने करावा.
- एका महाविद्यालयाद्वारा समूह नाटक एकच असावे मात्र एकपात्री प्रयोग असल्यास समूह आणि एकपात्री अशा दोन प्रयोगाची संधी उपलब्ध असेल.
- नाटकाचा वेळ प्रत्येकी जास्तीत जास्त १५ मिनिटे असावा.
- नाटकाचा विषय आणि त्याचा थोडक्यात सारांश आणि मुख्य कलावंताचे नाव नोंदणी करण्याच्या वेळी देणे आवश्यक असेल.
- काही व्यक्ती किंवा संस्थेची इच्छा असल्यास त्यांच्या नावाने काही पारितोषिके जाहीर करू शकतात अशा व्यक्ती किंवा संस्था यांनी कृपया संयोजकांना संपर्क करावा.
- नाट्य स्पर्धे दरम्यान कोणत्याही कारणास्तव वाद निर्माण झाल्यास संयोजकांचा निर्णय अंतिम असेल.

**महाविद्यालया विषयी थोडेसे..**

श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक हे गोंदिया शिक्षण संस्थेद्वारे संचालित महाविद्यालय १९७० ला सुरू करण्यात आले. रामटेक खिडसी रोड वर स्थित या महाविद्यालयाला सुंदर निसर्गाचे देणं लाभलेले आहे. महाविद्यालयात कला आणि वाणिज्य दोन शाखा असून मागील ५० वर्षात राष्ट्रीय विकासात हातभार लावणारी हजारो लोक महाविद्यालयांनी घडविले. प्रशासनाच्या आणि खाजगी क्षेत्रात अनेक लोकांना यशस्वी जीवन मिळवून देण्यात महाविद्यालयाचे अनन्य साधारण महत्व आहे. २०१९-२० हे वर्ष महाविद्यालयाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या निमित्याने आयोजित उपक्रमांना आपले सहकार्य मिळावे ही विनंती.

संयोजक
**डॉ. श्रीकांत ब. भोवते**

नियोजन समिती
**प्रा. सुनील कठाने, प्रा. अमरीश ठाकरे, प्रा. सुभाष सेलोकर**


प्राचार्य
**डॉ. संगीता टक्कामोरे**

---

**संपर्क व नोंदणी**

9420 3040 24, 9637 0770 27, 9860 6713 35

**E-mail :** sntcollegeramtek@gmail.com **Website :** www.sntcollegeramtek.org


youtube.com/watch?v=hV9EJVQpIqM&t=48s
Apps
Google
Dashboard
UGC MOOCs: A Ver...
Welcome to UGC,...
https://policeseva.k...
sumit.bulksmsnagp...
YouTube IN
voting awareness
Voting awareness skit play Dr Ambedkar College dikshabhumi Nagpur
6 views • Oct 19, 2019
1
0
SHARE
SAVE
Nikhil motghare


Gondia Education Societie's
Shri Narendra Tidke College of Arts and Commerce Ramtek, Dist. Nagpur
Collaboration with
National Service Scheme (NSS) R T M Nagpur University, Nagpur
& Sub Divisional Office, Ramtek, Dist. Nagpur
University Level
Drama Competition
REDMI K20 PRO
YASH


REDMI K20 PRO
YASH


गोंदिया शिक्षण संस्था द्वारा संचालित
श्री. नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक
REDMI K20 PRO
YASH